*Annexure XIC (6), (Vide Article - 11.06)*

<u>मालकी जमिनीतील झाडांच्या तोडीबाबत</u>
अवैध वृक्ष तोडीला आळा घालण्याच्या दृष्टीने
करावयाची उपाययोजना..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
परिपत्रक क्र. वृक्षनि–५०८०/११४३२/२००१/ग–७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक २९ नोव्हेंबर १९८५.

<u>परिपत्रक</u>

शासनाच्या असे निदर्शनास आणण्यात आले आहे की, जेथे व्यक्तिगत मालकीच्या जमिनी लगत शासकीय वन आहे, तेथे व्यक्तिगत मालकीच्या – जमिनीतील झाडे तोडण्यासाठी प्रथम परवानगी घेतली जाते व त्या झाडांची तोड करीत असतानाच लगतच्या शासकीय वनातील झाडांचीही अवैध तोड केली जाते. अशा प्रकारच्या अवैध वृक्षतोडीला आळा घालण्याकरिता काय कारवाई करावी, हा प्रश्न गेल्या काही काळापासून शासनाच्या विचाराधीन होता. शासनाला असे वाटते की, महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत [नियमन] अधिनियम, १९६४ यातील तरतुदीप्रमाणे व्यक्तीगत मालकीच्या जमिनीतील झाडांची तोड करण्यास परवानगी मिळावी म्हणून जेव्हा महसूल अधिकाऱ्यांकडे अर्ज केला जातो, तेव्हा प्रथमत: त्या अर्जाची छाननी व चौकशी योग्य त–हेने व काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. या अर्जाबद्दल चौकशी करताना चौकशी अधिकाऱ्यांनी जर पुढीलप्रमाणे कार्यवाही केली तर ज्या प्रकारच्या प्रकरणाचा उल्लेख वर केला आहे त्या प्रकारच्या – प्रकरणांना बराचसा आळा बसू शकेल :–

१] ज्या मालकी जमिनीतील झाडे तोडण्यास १९६४ च्या अधि- नियमातील तरतुदीप्रमाणे परवानगी मागितली असेल, त्या जमिनीचे अगोदरच्या १--२ वर्षांचे अभिलेख [रेकॉर्ड] चालू वर्षाच्या जमिनीच्या अभिलेखाशी नीट पडताळून संबंधित जमिनीत प्रमाणाबाहेर जास्त झाडे दाखविली गेली नाहीत ना, याची खात्री करून घ्यावी.

२] जमिनीची पाहणी महसूल निरीक्षकांनी व्यक्तीश: करावी व त्या जमिनीतील झाडांची संख्या त्यांनी प्रमाणित करावी.

३] अर्जदाराचा लेखी जबाब चौकशी अधिकाऱ्यांनी घेऊन झाडांची संख्या इत्यादि अभिलेखाप्रमाणे आहे ना, याची खात्री झाडे तोडण्यास परवानगी देण्यापूर्वी करावी.

२/– ज्या ठिकाणी व्यक्तीगत मालकीच्या जमिनी लगत शासकीय वन आहे, अशा जमिनीचे सीमांकन जिल्हाधिकाऱ्यांनी न चुकता करून घ्यावे व ते सीमांकन महसूल आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तरित्या करावे. जमिनीच्या हद्दीबाबत काही मतभेद उपस्थित झाल्यास ते प्रकरण संबंधित जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख यांचेकडे पाठवावे व तसे संबंधित अधिकाऱ्यास कळवावे, त्यानंतर

भूमि अभिलेख अधिका-यांनी वन व विभागाच्या प्रतिनिधी समक्ष जमिनीची मोजणी करावी व त्या विभागाच्या अधिका-यांनी जमिनीचे सीमांकन बरोबर केल्याचे संयुक्त प्रमाणपत्र द्यावे.

३/- सर्व जिल्हाधिकारी व अन्य संबंधित महसूल अधिकारी यांनी वर निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही करावी, अशी त्यांना विनंती आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.

सही/-
[ ग. द. परांजपे ]
अवर सचिव,

प्रति :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

---

क्रमांक :- कक्ष-११/भूमि/२०७/८५-८६/१४३४
पुणे ४११ ००१, दि.३१-१२-१९८५

प्रतिलिपी :-

१] वनसंरक्षक [सर्व]
२] विभागीय वन अधिकारी, [सर्व]
३] उप विभागीय वन अधिकारी, स्वतंत्र [सर्व]

यांना माहिती व जरूरी कार्यवाहीसाठी रवाना.

मुख्य वनसंरक्षक [उत्पादन]
महाराष्ट्र राज्य पुणे. करिता

---

राज/२४१२.